प्राथमिक स्तरावरील शाळा सिदधि कार्यक्रमाच्या परिणामकारकतेचा-अभ्यास

अंतरविद्याशाखे अंतर्गत (शिक्षणशास्त्र) विद्यावाचस्पती पदवीच्या अंशत: पुर्तीसाठी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठास सादर केलेला संशोधन आराखडा

संशोधक
कु. स्नेहल विजयकुमार थोरात

मार्गदर्शक
डॉ. पुंडगे मधुकर अंबाजी

शिक्षणशास्त्र संकुल
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

२०१७-१८

प्रस्तावना

शालेय स्तरावर शिक्षणाची मानके सुधारण्याची नितांत आवश्यकता विचारात घेवून शालेय सुधारणा करण्याचा राष्ट्रव्यापी कार्यक्रम विकसित केला जावा. असा उल्लेख शिक्षण आयोग १९६४-६६ मधील शिक्षण आयोगाच्या शिफारशी मध्ये करण्यात आला आहे. जेणेकरून प्रत्येक शाळेस आपल्या क्षमतेने सर्वोत्कृष्ट परिणाम मिळविण्यासाठी पोषक वातावरण निर्माण होईल असा या मागील उद्देश आहे.

गुजरात सरकारचा ‘गुणोत्सव’ ओरिसा सरकारचा ‘समिक्षा’ कर्नाटक सरकाने विकसित केलेल्या ‘शालेय गुणवत्ता व प्रमाणिकरण आराखडा’ महाराष्ट्र राज्याने ‘माझी समृद्धशाळा, शाळा ग्रेडेशन’ इत्यादीसारख्या शाळा मूल्यांकनाच्या बलस्थानांचा अभ्यास करून ‘शाळा सिदधि’ राष्ट्रीय कार्यक्रम केंद्रशासनाने जाहिर केला आहे. शाळा मूल्यांकना संदर्भातील. विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संशोधनाचा विचार मानके व मूल्यांकन आराखडा बनवितांना करण्यात आलेला आहे. राज्यात प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमाची अमलबजावणी सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षापासून संदर्भहिन शासन निर्यानुसार सुरू करण्यात आली आहे. सदर कार्यक्रमामध्ये ‘अध्ययन निष्पत्ती’ सोबत प्रक्रियेचा देखील पाठपुरावा केला जात आहे. वाचन, लेखन संख्याज्ञान आणि संख्यांवरील क्रियांच्या क्षमतांची संपादनूक प्रभुत्त्व पातळीकडे जाण्यासाठी आवश्यक आहेत. या प्रक्रिया विचारात घेवून राज्यातील सर्वमुले प्रगत होण्याच्यादृष्टीने सर्व समावेशक कार्य करण्यात येत आहे. या प्रक्रिया विचारात घेवून राज्यातील सर्व मुले प्रगत होण्याच्यादृष्टीने सर्व समावेशक कार्य करण्यात येत आहे. यामध्ये वर्षभरात तिन मूल्यमापण चाचण्यांचे आयोजन, शिक्षक स्नेही, प्रशासकिय वातावरण शिक्षकांच्या प्रशिक्षण, मुल निहाय कृती आराखडा इत्यादी बाबींचा समावेश आहे.

सर्व मुलांना गुणवत्तापुर्ण शिक्षणाचा अधिकार सर्व मुलांना प्राप्त झाला आहे. सर्व मुले शिकु शकतात हा विश्वास सातारा जिल्ह्यातील कुमटे बीटमधील ४० शाळांमध्ये सुरू असलेल्या ज्ञानरचननावाद पद्धातीने सुरू केला आहे. याच धरतीवर राज्यात विविध जिल्ह्यामधील शाळांमध्ये सर्व मुले शिकण्याचे काम सुरू आहे. यासाठी राज्यस्तरावरून विविध पातळीवर शिक्षण परिषदा व शिक्षण वारीचे आयोजन करण्यात येत आहे. त्यामध्यमातून शिक्षक व परिवेक्षित व्यवस्था यामध्ये

आत्मविश्वास जागृत होत आहे. प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र हा या कार्यक्रमाद्वारे राज्यातील सर्व मुलांना गुणवत्तापुर्ण शिक्षण जलदगतीने देण्यासाठी अत्यंत आशादायी वातावरण निर्माण झाले आहे. गुणवत्तपुर्ण शिक्षण देणाऱ्या इंग्रजी भाषेचे विशेषत: स्पोकन इंग्लिश गुणवत्तापूर्ण देणाऱ्या शाळांकडे पालक व समाज आकृष्ठ होवून भरिव मदत करीत आहेत.

वरिल प्रक्रियेचे राज्यातील मोठ्या संख्येने शाळा समृद्ध शाळा होण्याच्या मार्गाने आहेत. शिक्षक हक्क कायदा २००९ च्या सुपुर्ण अमलबजावणी करीता १०० टक्के शाळा ह्या समृद्ध असल्या पाहिजेत. त्या दृष्टीने आपले प्रत्येक कार्य समृद्ध शाळा तयार करण्याच्या दृष्टीने राहिल याची काळजी राज्यशासन घेईल.

संशोधनाची गरज :

प्राथमिक शाळेतील मानवी व भौतिक घटकांचा अभ्यास करण्याच्या दृष्टीने सदरील विषय गरजेचा आहे. कारण वर्गातील विद्यार्थ्यांची उपस्थिती त्यांची शैक्षणिक प्राविण्य, विद्यार्थ्यांची अध्ययन प्रक्रिया तसेच शिक्षकांची दैनंदिन कार्यशैली. अध्यन आणि अध्यापन प्रक्रिया यामध्ये शैक्षणिक प्रगतिच्या दृष्टीने गांभिर्याने ही प्रक्रिया पुर्ण केली जाते का? या घटकांचा अभ्यास करणे गरजेचे वाटतते.

भौतिक साधन सामग्री शाळेला पुरेशी आहे का? वर्ग खाली, इमारत, विद्यार्थ्यांना वर्गातील बसण्याचे ठिकाण, पिण्याचे पाणी, स्वच्छता गृहे., खिचडी गृहे, शालेय परिसर, शिक्षकांचे विद्यार्थ्यां प्रती व्यवस्थावण व मार्गदर्शन, शिक्षक-मुख्याध्यापक यांचे व्यवस्थापण व्यस्थिती आहे का? या घटकांचा अभ्यास करण्याच्या दृष्टीने सदरील विषय गरजेचा वाटतो.

शाळासिदधि या कार्यक्रमाच्या अमलबजावणीतुन शाळेची प्रगती व दर्जा कशा प्रकारे वृद्धींगत होतो. ही प्रक्रिया ग्रामिण व शहरी भागातील शाळेमध्ये कोणत्या परक जाणवतो, तसेच जिल्हा परिषद व खाजगीशाळामध्ये शाळासिदधि या कार्यक्रमाच्या अनुषंघाने कोणती तफावत आढळून येते. या प्रक्रिर्येचा अभ्यास करणे संशोधकाला गरजेचे वाटते.

संशोधनाचे महत्व :-

शैक्षणिक मुल्यमापण प्रक्रिया ही शाळेच्या विकासामध्ये महत्त्वाची भूमिका बजावते कारण शाळेचा विकास हाच संपूर्ण समजाचा, राज्याचा, देशाचा विकास मानला जातो. ज्यातून देशाची भावीपिढी घडविणारे बालक निर्माण होतात. आणि शाळेचा प्रत्येक घटक हा शाळेच्या प्रगतिकचा

महत्त्वाचा घटक मानला जातो. ज्यातून शाळेच्या संपूर्ण मूल्यमापण प्रक्रियामध्ये महत्त्वाची भर टाकली जाते.

शालेय स्तरावरील मानवी व भौतिक घटकांच्या सुधारणेच्यादृष्टीने शाळासिदधि कार्यक्रम महत्त्वाचा ठरतो. कारण की, ज्यामधुन शाळेच्या व्यवस्थापणामध्ये सुसुत्रता निर्माण होते. शाळेचे दैनंदिन कार्य हे रितसर पुर्ण केल्या जाते. त्यामधुन मानवी व भौतिक घटकांमध्ये प्रगती घडवून आणण्याच्यादृष्टीने सदरील संशोधन विषय महत्त्वाचा ठरतो.

शिक्षकांच्या अध्ययन आध्यापनाच्या दृष्टीने शैक्षणिक व सामाजिक प्रगती घडवीने व नविन संकल्पना, विचार व सृजनशिलता निर्माण करून एक कृतिशील बालक निर्माण करण्याच्यादृष्टीने आणि राज्याच्या शैक्षणिक विकासामध्ये भर घालण्याच्या दृष्टीने शाळासिदधि या कार्यक्रमाची भूमिका महत्त्वाची ठरते.

समस्या विधान : प्राथमिक स्तरावरील शाळा सिदधि कार्यक्रमाच्या परिणामकारकतेचा-अभ्यास

कार्यात्मक व्याख्या :

१) नांदेड जिल्हा : भारतातील महाराष्ट्र राज्याचा एक प्रशासकिय जिल्हा व मुख्यालय यांच्या माध्यमातुन शासकिय व प्रशासकिय कार्य पार पाडली जातात. या ठिकाणाला नांदेड जिल्हा असे संबोधण्यात आले आहे.

२) प्राथमिक स्तर : महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व संशोधन मंडळाने निर्मित अभ्यासक्रमांचा अवलंब करणारे इयत्ता १ ली ते ८ वी चे वर्ग म्हणजे प्राथमिक स्तर होय

३) शाळा सिदधि : स्वत:ची कामगीरी सुधारण्यासाठी भारतीय शाळांचे मुल्यमापण कसे करावे. याविषयी सर्व संबंधित घटकांच्या प्रक्रियेस शाळा सिदधि असे संबोधले जाते.

४) कार्यक्रम : पुर्व नियोजित एखाद्या विशिष्ट घटकावर घडवून आणलेली प्रक्रिर्या म्हणजे कार्यक्रम होय.

५) परिणाम : शाळा सिदधि या कार्यक्रमाच्या अंतर्गत जिल्हा निर्धारक, तालुका निर्धारक, शालेय घटक, मुख्याध्यापक, शिक्षक यांच्याद्वारे कार्यक्रमासंदर्भात केल्या जाणाऱ्या कृती कार्यक्रमाचा एका घटकाने दुसऱ्या घटकावर केलेली प्रक्रिया म्हणजे परिणाम होय.

संशोधनाची उद्दीष्ट्ये :-

१. नांदेड जिल्ह्यातील प्राथमिक स्तरावरील शाळा सिदधि कार्यक्रमाच्या परिणामकारकतेचा अभ्यास करणे.

२. नांदेड जिल्ह्यात प्राथमिक स्तरावरील शाळा सिदधि कार्यक्रमा अंतर्गत मराठी माध्यमांच्या शाळांचा अभ्यास करणे.

३. नांदेड जिल्ह्यातील प्राथमिक स्तरावरील शाळा सिदधि कार्यक्रमा अंतर्गत सामर्थ स्रोताच्या परिणामकारकतेचा अभ्यास करणे.

४. नांदेड जिल्ह्यातील प्राथमिक स्तरावरील शाळा सिदधि कार्यक्रमा अंतर्गत अध्ययन-अध्यापन, मूल्यांकनाच्या परिणामकारकतेचा अभ्यास करणे.

५. नांदेड जिल्ह्यातील प्राथमिक स्तरावरील शाळा सिदधि कार्यक्रमा अंतर्गत विद्यार्थ्यांची शैक्षणिक संपादणूक आणि विकासाच्या परिणामकारकतेचा अभ्यास करणे.

६. नांदेड जिल्ह्यातील प्राथमिक स्तरावरील शाळा सिदधि कार्यक्रमा अंतर्गत शालेय नेतृत्व व व्यवस्थापणाच्या परिणामकारकतेचा अभ्यास करणे.

७. नांदेड जिल्ह्यातील प्राथमिक स्तरावरील शाळा सिदधि कार्यक्रमा अंतर्गत आरोग्य आणि सरंक्षणाच्या परिणामकारकतेचा अभ्यास करणे.

गृहितके :-

१) शाळा सिदधि कार्यक्रमासाठी शालेय वातावरण परिणामकारक आहे.

२) प्राथमिक व उच्चप्राथमिक स्तरावरील मुल्यांकनासाठी विद्यार्थी जागरूक असतात.

३) शाळा सिदधि कार्यक्रमाचे व्यवस्थापण हे सकारात्मक आहे.

संशोधन परिकल्पना : प्राथमिक स्तरावरील शाळा सिदधि या कार्यक्रमच्या परिणामकारकतेचा अभ्यास करणे गरजेचे आहे.

शुन्य परिकल्पना :

१) प्राथमिक व उच्चप्राथमिक स्तरावरील शाळा सिदधि कार्यक्रमाच्या परिणामकारकतेमध्ये सार्थ फरक नाही.

२) प्राथमिक व उच्चप्राथमिक स्तरावरील मराठी माध्यमांच्या शाळेत शाळा सिदधि कार्यक्रमाच्या परिणामकारकतेमध्ये सार्थ फरक नाही.

३) प्राथमिक व उच्चप्राथमिक स्तरावरील शाळा सिदधि कार्यक्रमाच्या परिणामकारकतेमध्ये सामर्थ स्त्रोत यामध्ये सार्थ फरक नाही.

४) प्राथमिक व उच्चप्राथमिक स्तरावरील शाळा सिदधि या कार्यक्रमाच्या परिणामकारकतेमध्ये अध्ययन-अध्यापन, मूल्यांकन यामध्ये सार्थ फरक नाही.

५) प्राथमिक व उच्चप्राथमिक स्तरावरील शाळा सिदधि कार्यक्रमाच्या परिणामकारकतेमध्ये शैक्षणिक संपादणूक व विकास यामध्ये सार्थ फरक नाही.

६) प्राथमिक व उच्चप्राथमिक स्तरावरील शाळा सिदधि कार्यक्रमाच्या परिणामकारकतेमध्ये नेतृत्व व व्यवस्थापण यामध्ये सार्थ फरक नाही.

७) प्राथमिक व उच्चप्राथमिक स्तरावरील शाळा सिदधि या कार्यक्रमाच्या परिणामकारकतेमध्ये आरोग्य आणि सरंक्षण यामध्ये सार्थ फरक नाही.

संशोधनाची व्याप्ती :-

१) क्षेत्र व्याप्ती :- सदरील संशोधन नांदेड जिल्ह्यातील जिल्हा परिषद, मनपा, खाजगी अनुदानित व विनाअनुदानी शाळांपुरतेच व्यापक आहे.

२) आशय व्याप्ती :- सदरील संशोधनाचा आशय हा प्राथमिक व उच्च प्राथमिक स्तरापुरताच व्यापक आहे.

३) घटक व्याप्ती :- सदर संशाधेन प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळेतील भौतिक व अभौतिक घटकांच्या मूल्यांकनापुरतेच व्यापक आहे.

४) काल व्याप्ती :- सदर संशोधन २०१८ ते २०२१ या दरम्यान पुर्ण केले जाईल.

मर्यादा :-

१) क्षेत्र मर्यादा :- सदरील संशोधन नांदेड जिल्ह्यातील जिल्हा परिषद, मनपा, खाजगी अनुदानित व विनाअनुदानी शाळांपुरतेच मर्यादीत आहे.

२) आशय मर्यादा:- सदरील संशोधनाचा आशय हा प्राथमिक व उच्च प्राथमिक स्तरापुरताच मर्यादीत आहे.

३) घटक मर्यादा :- सदर संशाधेन प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळेतील भौतिक व अभौतिक घटकांच्या मूल्यांकनापुरतेच मर्यादीत आहे आहे.

४) काल मर्यादा :- सदर संशोधन २०१८ ते २०२१ पुरतेच मर्यादीत आहे.

परिमार्यादा :-

१) मराठी माध्यमाच्या प्राथमिक व उच्चप्राथमिक शाळांचा समावेश माहिती गोळा करण्यासाठी केला जाईल.
२) प्राथमिक व उच्च प्राथमिक स्तरावरील मूल्यांकन प्रक्रियेचा अभ्यास केला जाईल.
३) शाळा सिदधि या महाराष्ट्र शासनाने निर्धारित केलेल्या शाळा सिदधि या कार्यक्रमाच्या दस्ताऐवजांचा अभ्यास करण्यात येईल.

संशोधनाची कार्यपद्धती :- सदर संशोधनासाठी सर्वेक्षण संशोधन पद्धतीचा वापर करण्यात येईल.

नमुना निवड : नांदेड जिल्ह्यातील एकूण शाळांची जनसंख्या ३७०० असून तालुक्यांची संख्या १६ आहे. या प्रत्येक तालुक्यामधुन स्तरीय नमुना निवड पद्धतीनुसार प्रत्येकी १५% नुसार १६ तालुक्यामधुन ८८ प्रमाणे ५५५ शाळांची नमुना म्हणून निवड करण्यात आलेली आहे. विद्यार्थ्यांची निवड सहेतुक नमुना निवड पद्धतीचा वापर करण्यात येईल व शिक्षक यांची निवड प्रासंगिक नमुना निवडीनुसार करण्यात येईल.

संशोधनाची साधने :

प्रशनावली, मुलाखत आणि पडताळा सूची या साधनांचा माहिती गोळा करण्यासाठी उपयोग करण्यात येईल.

संख्याशास्त्रीय परिमाण :-

सदरील संशोधनासाठी t-test, qui-squre आणि आलेख इत्यादी संख्याशास्त्रीय परिमाणांचा वापर करण्यात येईल.

संशोधनाची कार्यवाही :-

१) प्रथम संबंधित साहित्याचा आढावा घेण्यात येईल.

२) समस्या व उद्दिष्टानुसार नमुना कार्यपद्धती निश्चित केली जाईल.

३) साधन निर्मिती शिक्षकांसाठी प्रश्नावली, पडताळा सूची व मुख्याध्यापक यांच्यासाठी मुलाखत सूची निश्चित केली जाईल.

४) माहिती संकलनाच्या चाचणीचे प्रमाणिकरण टप्याद्वारे करण्यात येईल.

५) माहिती संकलनाच्या साधनांद्वारे माहिती संकलित करण्यात येईल.

६) संकलित माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन करण्यात येईल.

७) संकलित माहितीचे अर्थनिर्वचन व विश्लेण केल्यानंतर मार्गदर्शकाकडून तपासून घेतल्या जाईल व दुरूस्तीचे निराकरण केल्या जाईल.

८) मार्गदर्शकाच्या मार्गदर्शनानुसार प्रकण लिहून चुकांची तपासणी करण्यात येईल.

९) प्रबंधाची बांधणी करून पाच प्रती विद्यापीठास सादर केल्या जातील.

१०) प्रबंधाची प्रकरण योजना

१. प्रस्तावना

२. संबंधित संशोधनाचा व साहित्याचा आढावा

३. संशोधनाची कार्यपद्धती.

४. माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन

५. निष्कर्ष व शिफारशी

कार्यसूची वेळापत्रक :

अ. क्र.	विवरण	कालवधी
१	संशोधन विषयाची निश्चिती करणे.	६ महीने
२	संशोधन साहित्याचा पुर्व आढावा घेणे.	४ महिने
३	संशोधन साधन तयार करणे व प्रामणिकरण करणे.	१० महिने
४	माहिती संकलीत करणे	५ महिने
५	माहितीचे विश्लेषण करणे	२ महिने
६	प्रबंध टंकलिखित करणे	२ महिने
७	शोध प्रबंध विद्यापीठास सादर करणे	१ महिना
एकूण		**३० महिने**

अंदाजपत्र :-

अ. क्र.	विवरण	खर्च
१	पीएच. डी. शुल्क	१५,०००/-
२	संबंधित साहित्याचा आढावा	८,०००/-
३	डी. टी. पी. टाईप	६,०००/-
४	पुस्तक खरेदी	१०,०००/-
५	पेन ड्रायु	१५००/-
६	झेरॉक्स	१०,०००/-
७	प्रबंध पाच प्रति	५,०००/-
८	बाईंडिग	४,०००/-
९	प्रवास खर्च	४,०००/-
१०	कार्यशाळा	५,०००/-
११	सेमिनार	५,०००/-
एकूण		**७३,५००/-**

संदर्भ ग्रंथ सूची :-

भितांडे वि. रा. (२००७) - *शैक्षणिक संशोधन पद्धती,* पुणे : नित्यनूतन प्रकाशन

दाले आर. (१९९३) - *बालमंदीरातील नव्यावाटा नव्या दिशा,* पुणे : उन्मय प्रकाशन.

नाकतोडे (१९९७) - *शालेय व्यवस्थापन,शैक्षणिक स्वरचना भारतीय अधुनिक विचार प्रवाह* नागपुर : विद्या प्रकाशन.

नागपुरे व. रा. (१९८९) - *समानतेसाठी शिक्षण,* पुणे : महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद.

मुळे आर. एस., उमाटे व्हि. टि. (१९९८) - *शैक्षणिक संशोधनाची मुलतत्त्वे* (तिसरी अवृत्ती), औरंगाबद : विद्या बुक्स्.

मराठे एम. जी. (२००३) - *प्राथमिक शिक्षण सेवाअंतर्गत शिक्षकांची हस्तपुस्तीका,* पुणे : राज्य शिक्षण मंडळ.

पारसनिस, हेमलता (२००८) - *शैक्षणिक संशोधनाची ओळख,* पुणे: नित्यनूतन प्रकाशन.

पारसनिस न. रा. (१९९३) - *शिक्षकांचे प्रशिक्षण,* पुणे : नूतन प्रकाशन.

पंडित बी. बी. (२००५) - *शिक्षणातील संशोधन,* पुणे : नित्यनूतन प्रकाशन.

शाळा सिदधि हस्त पुस्तीका, महाराष्ट्र शासन.

संशोधक
कु. स्नेहल विजयकुमार थोरात

मार्गदर्शक
डॉ. पुंडगे एम. ए.